मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

शुक्रवार, दिनांक : ३० ऑक्टोबर १९९८ रोजी झालेल्या ५७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ५७ वी बैठक, शुक्रवार, दिनांक : ३० ऑक्टोबर १९९८ रोजी दुपारी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते :-

१.	ॲडव्होकेट श्री. मधु चव्हाण	:	सभापती
२.	श्रीमती वन्दना खुल्लर	:	मुख्य अधिकारी
३.	श्री. खाबडे	:	उपसचिव/महाराष्ट्र शासन
४.	श्री. अरविंद रेळे	:	सदस्य
५.	श्री. चंद्रकांत विश्वासराव	:	,,
६.	श्री. अमोद उसपकर	:	,,
७.	श्री. भालचंद्र ठाकूर	:	,,
८.	श्री. दगडू सकपाळ	:	,,
९.	श्री. [illegible]	:	,,
१०	ॲडव्होकेट श्री. प्रकाश भुवड	:	,,
११.	श्री. गणेश तिकोने	:	,,
१२.	श्री. अरुण सावरकर	:	,,
१३.	श्री. अनंत पालकर	:	,,
१४.	श्री. दाजी (गोपाळ) मोडक	:	,,
१५.	प्रमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनिधी	:	निमंत्रक
१६.	उपकर निर्धारक व संकलक (शहरे), म.न.पा.	:	,,

मा.सभापती यांनी बैठकीच्या सुरवातीस उपस्थित सर्व सन्माननीय सदस्य व अधिका-यांचे स्वागत केले. श्री. विश्वास कोकणे, उपसचिव, महाराष्ट्र शासन यांच्या जागी श्री. खाबडे, उपसचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांनी पदभार सांभाळलेला असून शासनाचे प्रतिनिधी म्हणून हजर आहेत अशी माहिती देवून उपसचिव, श्री. खाबडे यांचे मा. सभापती यांनी सर्वांच्यावतीने स्वागत केले व सचिव यांना बैठकीस सुरवात करण्याच्या सूचना दिल्या.

......२/-

सचिव यांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरवात केली.

बाब क्रमांक : ५७/१

विषय :- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि. २४/९/९८ रोजी संपन्न झालेल्या ५६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणेबाबत.

विषयांकित कार्यवृत्तांत सर्व सन्मा. सदस्यांनी स्थायी करण्यासाठी पृष्ठ क्र. १ ते १११ वर सादर करण्यात आला आहे.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा करताना मा.सदस्य श्री. रेळे यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत उपसचिव, श्री. कोकणे यांनी सुकथनकर समितीच्या अहवालाची प्रत सर्व सन्मा. सदस्यांना त्वरीत उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. परंतु अद्यापही सुकथनकर समितीच्या अहवालाच्या प्रती सन्मा. सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत व आता तरी सुकथनकर समितीच्या अहवालाची प्रत देण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली.

यावर मा. सभापती यांनी उपसचिव, श्री. खाबडे यांना सुकथनकर समितीच्या अहवालाची प्रत १-२ दिवसांत उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी पृ.क्र. ४५ वर दुसऱ्या परिच्छेदामध्ये विधान-परिषद सदस्या श्रीमती विणा इर्ला नमुद करण्यात आले आहे त्याऐवजी श्रीमती विणा शर्मा लिहिण्यात यावे. यावर मा. सभापती यांनी तशी दुरुस्ती करण्यास सचिवांना सुचना दिल्या.

सविस्तर चर्चेअंती ५७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक : ५७/२ (कार्यकारी अभियंता, सहकार कक्ष)

विषय :- इमारत क्र. ५६, मैत्री बिल्डींग या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या गावदेवी रोड, मुंबई-४००००७ येथील भूखंड व त्यावरील इमारती सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

विषयांकित प्रस्ताव पृ.क्र. ११३ ते ११९ वर सादर करण्यात आलेला आहे.

...... ३/-

मा॰ सदस्य श्री॰उत्तेकर यांनी असे मत व्यक्त केले की, प्रस्तावात नमूद केल्यानुसार मालमत्ताधारकाने ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे॰ किंवा नाही याची माहिती मुख्य प्रवर्तकाकडून न घेता ती मंडळाने घ्यावी व प्रस्तावात नमूद करावी॰ कारण ७० % लोकांची जरी संमती असली तरी काही भाडेकरु दोन्ही ठिकाणी सही करत असतात॰

यावर मा॰ सभापती यांनी सन्मा॰सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा तांत्रिकदृष्ट्या बरोबर असल्यामुळे त्याप्रमाणे प्रस्तावात नोंद घ्यावी अशी सूचना केली व सर्वानुमते प्रस्ताव मंजूर करण्यात आला॰

ठराव क्रमांक : ५७/४२७

इमारत क्रमांक ५६, मैत्री बिल्डींग, गावदेवी रोड, मुंबई-४००००७ येथील भूखंड व त्यावरील इमारती सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याच्या प्रस्तावास सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मंजूरी देण्यात आली॰

-----x०x-----

बाब क्रमांक : ५७/३ [उपमुख्य अधिकारी (संक्रमण गाळे)]

विषय :- मंडळाच्या संक्रमण शिबिरातील रिक्त/घूसखोर गाळ्यांची दि॰ २७॰१०॰९८ पर्यंत माहिती दर्शविणारा तक्ता॰

विषयांकित तक्ता पृष्ठ क्र॰ १२१ वर सादर करण्यात आला आहे॰

मा॰ सदस्य श्री॰ विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, ४ महिन्यापूर्वी त्यांनी तक्रार केली होती की, खतिजाबाई इमारतीची दुरुस्ती १ $\frac{1}{2}$ वर्षांपूर्वी पूर्ण होऊनही भाडेकरुने अजूनही संक्रमण गाळ्याचा ताबा सोडलेला नाही व जुन्या इमारतीत भाडेकरु ठेवलेला आहे॰ अद्याप त्यांच्या या तक्रारीवर कार्यवाही करुन त्यांना उत्तर देण्यात आले नाही॰

यावर मा॰ सभापती यांनी श्री॰ पडवळे, उपमुख्य अधिकारी यांना या बाबीची नोंद घेण्यास सांगून संबंधित सहाय्यक मिळकत व्यवस्थापक यांच्याकडून या प्रकरणाची माहिती घेऊन ती बैठकीत सादर करण्यास सूचना दिल्या॰

सविस्तर चर्चेअंती सदर बाबीची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.

बाब क्रमांक : ५७/४ [उपमुख्य अधिकारी [पुनर्रचित गाळे]]

[अ] विषय :- पुनर्रचित इमारतीमधील घुसखोरांनी व्यापलेल्या गाळयांचा दि. ३०.९.९८ पर्यंतचा इमारतीनिहाय गोषवारा.

विषयांकित गोषवारा पृष्ठ क्र. १२३ वर सादर करण्यात आला आहे.

मुख्य अधिकारी यांनी विनंती केली की, विषयांकित गोषवा-यामध्ये चुकीची माहिती देण्यात आली आहे असे जर सन्मा. सदस्यांच्या लक्षात आल्यास व त्यांना असलेली माहिती त्यांच्या निदर्शनात आणल्यास त्याप्रमाणे रेकॉर्डमध्ये सुधारणा करण्यात येईल.

यावर मा.सदस्य श्री. सकपाळ यांनी अशी विचारणा केली की, "घुसखोर" या विषयावर किती वेळा चर्चा करणार व त्यातून कोणता मार्ग निघणार ?

यावर मा.सभापती यांनी माहिती दिली की, मा. उच्च न्यायालयामध्ये वेगवेगळया विषयासंबंधी तीन याचिका दाखल झालेल्या आहेत. मा. उच्च न्यायालयाने या याचिकांबाबत मंडळाला आदेश दिलेले आहे की, घुसखोरांना मंडळाने बाहेर काढावेत व त्यांना काढण्यासाठी मंडळ किती कालावधी घेणार तो कालावधी निश्चित करण्यास सांगितले आहे. या आदेशानंतर मंडळाने घुसखोरीबाबत दोन भाग केलेले आहेत. संक्रमण शिबिरातील घुसखोर आणि पुनर्रचित इमारतीतील घुसखोर, की ज्यांना कार्यालयातूनच कळविले गेल्यामुळे ते घुसखोर आहेत. सुमारे २००० घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी शासनाने स्थगिती दिली आहे व घुसखोरांना कोणतेही संरक्षण देता येत नाही हा न्यायालयाचा निर्णय शासनाला कळविण्यात आला असून याबाबत न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करायचे असल्यामुळे पुढे काय करायचे याबाबत शासनाकडे विचारणा करण्यात आलेली आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर माहितीची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.

[ब] विषय :- मा.मंत्री महोदय यांच्या २० % कोटयातून देण्यात आले देण्यात आलेले गाळे नियमित करण्याबाबत.

विषयांकित प्रस्ताव पृष्ठ क्र. १२५ वर सादर करण्यात आला आहे.

मा.सभापती यांनी यावर असे मत व्यक्त केले की, खोटया कागदपत्रांच्या आधारे विशेष बाब म्हणून गाळा वाटप करण्यास कोणत्याही मंत्र्याला अधिकार नाहीत. त्यामुळे संबंधित अधिका-यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले होते की, ज्याला विशेष बाब म्हणून त्यांनी गाळा वाटप करण्यास सांगितले आहे ते आदेश चुकीचे आहेत. प्रस्तावातील विषय असा आहे की, खोटया कागदपत्राच्या आधारे २० टक्के कोटयातून जागा मिळाल्यानंतर ती विकण्यात आली व विकत घेणा-या व्यक्तीने सदर गाळा त्याच्या नांवे नियमित करुन मिळावा असा मंडळाकडे अर्ज केल्यावर मंडळातर्फे त्याला सांगण्यात आले की, त्याने ज्या व्यक्तीकडून गाळा विकत घेतलेला आहे तो गाळा त्या व्यक्तीने खोटया कागदपत्रांच्या आधारे मिळविलेला असल्यामुळे व तसे सिध्द झाल्यामुळे तो गाळा त्यांच्या नांवावर नियमित करता येणार नाही, व तो गाळा त्यांनी रिकामा करुन मंडळाच्या ताब्यात द्यावा. यामध्ये दुसरा भाग असा आहे की, बृहतसूचीवरील अधिकृत गाळेधारकाने/हक्कधारकाने गाळा मिळण्यासाठी नंबर आलेला नसतानाही विशेष बाब म्हणून २० % कोटयातून गाळा मिळविला व नंतर तो त्याने विकला व विकत घेणा-या व्यक्तीने तो गाळा नियमित करुन मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. अशाप्रकारे बृहत्सूचीवरील अधिकृत हक्कदारांकडून गाळे विकत घेऊन नियमित करण्यासाठी १४५ प्रकरणे पुढे आलेली आहेत.

यावर मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, खोटया कागदपत्रांच्या आधारे गाळे मिळविले आहेत त्यांच्याबाबतीत कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? अशा लोकांना गाळयांतून बाहेर काढण्यासाठी निर्णय झाला पाहिजे.

यावर मा.सभापती यांनी खोटया कागदपत्रांच्या आधारे गाळे मिळविण्याच्या प्रकरणी शासनाने स्थगिती दिलेली आहे.

यावर अधिक माहिती देताना मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, याबाबत मागील अधिवेशनामध्ये मा. मंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे व शासनाकडून मंडळास लेखी आदेश देण्यात आलेले आहेत की, सदरहू लोकांची फसवणूक झालेली असल्यामुळे अशा लोकांना ते घुसखोर ठरत असले तरी गाळयाबाहेर काढू नये.

यावर मा.सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, बेकायदेशीररित्या गाळे मिळविलेल्या व्यक्तींना गाळयाबाहेर काढण्याचा निर्णय घ्यावा किंवा नियमित करण्याचा निर्णय घ्यावा. कोणतातरी एक निर्णय घेण्यात यावा. परंतु कोणत्याही नागरीकावर अन्याय होणार नाही हे पहावे.

यावर मा. सभापती यांनी विषयांकित बाब टिप्पणीद्वारे असाच निर्णय घेण्यात आलेला आहे की, २० टक्के कोटयातून मिळविलेले अधिकृत हक्कधारकांचे गाळे नियमित करण्यात यावेत व खोटया कागदपत्रांच्या आधारे मिळविलेल्या गाळयांबाबत शासनाने निर्णय घ्यावा. त्यांनी पुढे असे सुचविले की, प्रस्तावित १४५ प्रकरणे नियमित करताना त्यामध्ये मंडळाचे संबंधित अधिकारी आणखी काही प्रकरणे घुसवतील अशी भिती आहे असे मत व्यक्त करुन माहिती दिली की, त्यांना असे समजले आहे की, बृहत्सूचीवरील काही गाळेधारक मोठया क्षेत्रफळाचे गाळे मिळण्यास पात्र असूनही व गाळे उपलब्ध असूनही ते त्यांना न देता कमी क्षेत्रफळ असणा-या गाळेधारकास मात्र जास्त क्षेत्रफळाचे गाळे देण्यात येत आहेत. त्यामुळे मुख्य अधिकारी यांनी काळजीपूर्वक अशी प्रकरणे हाताळावीत अशी सुचना केली.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, बृहत्सूचीनुसार गाळे वाटपासाठी नंबर आल्यानंतर किमान १८० चौ.फुटाचा गाळा मिळण्यास पात्र असताना तेवढया क्षेत्रफळाचा गाळा नसेल व २२० चौ. फुटाचा गाळा उपलब्ध असेल व जादा क्षेत्रफळाचे पैसे भरण्यास गाळेधारक तयार असेल तर त्यांना तो गाळा देण्यात आला पाहिजे.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, गाळा मिळण्यासाठी नंबर आलेल्या गाळेधारकासाठी १८० चौ.फुटाचा गाळा उपलब्ध नसेल व २२० चौ.फुटाचा गाळा मिळण्यास पात्र असणा-या गाळेधारकास तो गाळा, त्याचा बृहत्सूचीनुसार नंबर मागे असला तरी देण्यात आला पाहिजे.

यावर मुख्य अधिकारी यांनी निदर्शनास आणले की, मंडळाच्या मागील एका बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला आहे की, मोठया क्षेत्रफळाचा गाळा मिळण्यासाठी बृहत्सूचीवरील एखादा गाळाधारक पात्र असेल व मोठया क्षेत्रफळाचा गाळाही उपलब्ध असेल तर अशा गाळेधारकास जरी त्याचा नंबर मागे असला तरी तो गाळा देण्यात यावा.

यावर अधिक माहिती देताना मा.सभापती यांनी सांगितले की, वरील निर्णय अशासाठी घेण्यात आला होता की, मोठे गाळे उपलब्ध असूनही व ते मिळण्यास पात्र असणा-या गाळेधारकांचा नंबर मागे असल्यामुळे ते गाळे त्यांना तेव्हाच्या वितरणपध्दतीनुसार वितरीत केले नाहीत. याचा परिणाम या मोठया गाळयांमध्ये घुसखोरी झाली म्हणून गाळे रिक्त राहून घुसखोरी होऊ नये म्हणून वरील निर्णय झालेला आहे.

वरील प्रदीर्घ चर्चे-अंती आणि सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सुचनांच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी यांची सदर १४५ प्रकरणामध्ये मान्यता घेवून नियमितीकरण करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

...... ७/-

ठराव क्रमांक : ५७/४२८

मा. मंत्रीमहोदय यांच्या २० टक्के कोटयातून देण्यात आलेले (रहिवाशांना) गाळे मुख्य अधिकारी यांच्या मान्यतेने प्रकरणनिहाय नियमितीकरण करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : ५७/५

[अ] विषय :- संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास - गाळे वाटप करणे व पाडणे...

विषयांकित टिप्पणी पृष्ठ क्र. १२७ ते १२९ वर सादर करण्यात आली आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, मागील बैठकीत ठरल्यानुसार चार संक्रमण शिबिरांचा म्हणजे, कुलाबा, वांद्रे[पश्चिम], ओशिवरा आणि जयकोच, जोगेश्वरी येथील तळमजल्याचे व विखुरलेले असे संक्रमण गाळे पाडून त्या ठिकाणी बहुमजली इमारत बांधण्यात येणार आहेत. या इमारतींमध्ये संक्रमण गाळे असतील व काही इमारतीतील गाळयांची विक्री करण्यात येणार आहे, अशा त-हेचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे, जेणेकरुन जुने व मोडकळीस आलेल्या गाळयांऐवजी ~~अधिक~~ नवीन संक्रमण गाळे उपलब्ध होतील. शिवाय प्राधिकरणाला गाळयांच्या विक्रीमुळे आर्थिक फायदा होईल ~~व तो पुनर्विकास~~ आणि म्हणून सदर योजना राबविण्यासाठी आता प्राधिकरणाच्या स्तरावर नामांकित वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करण्याबाबत विचारविनीमय चालू आहे. सदर पुनर्विकास योजना राबविण्यासाठी मोकळया भूखंडाची गरज असल्यामुळे जे गाळे रिक्त आहेत व जे ~~काही~~ गाळे लवकरच रिक्त होणार असल्यामुळे हे रिक्त गाळे ~~ताब्यात~~ पाडण्यास सुरवात करावी लागेल. विखुरलेले गाळे पाडून काही उपयोग होणार नसल्यामुळे इमारत बांधण्यासाठी एखादी जागा निश्चित करुन त्या जागेतील रहिवाशांना तेथेच इतर ठिकाणी रिक्त होणा-या गाळयांत हलवून त्याचे रिकामे झालेले गाळे पाडून त्या जागेवर नवीन इमारत बांधण्यात येईल. अशा प्रकारे पुनर्विकास करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

अधिक माहिती देताना मा. सभापती यांनी सांगितले की, पुनर्विकास करण्यात येणा-या वरील चार संक्रमण शिबिरांचा चटईक्षेत्र निर्देशांक फुकट जात आहे. म्हणून हया फुकट जाणा-या चटईक्षेत्र निर्देशांकाचा वापर करुन इमारती बांधायच्या. म्हणजे सध्या जेवढे संक्रमण गाळे उपलब्ध आहेत तेवढे किंवा त्यापेक्षा जास्त संक्रमण गाळे तर मिळतीलच

शिवाय काही इमारतींची विक्री करुन हा बांधकामाचा खर्च भागविणे शक्य होणार आहे.

यावर मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास करण्यासाठी ज्या अधिकृत लोकांना हलविण्यात येणार आहे त्या लोकांना त्याच संक्रमण शिबिरात जागा द्यावी व लोकांना हलविल्यानंतर रिक्त गाळ्यांत घुसखोरी होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी कुलाबा संक्रमण शिबिरात गाळे रिक्त नाहीत मग तेथे पुनर्विकास योजना कशी अंमलात आणणार ? अशी विचारणा केली.

यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, तेथे मंडळाची कार्यालयीन इमारत आहे व तळाला दुकाने असून वरच्या मजल्यावर मंडळाचे कार्यालय आहे तो सर्व भाग पाडून तेथे उपलब्ध होणाऱ्या भूखंडावर पहिली इमारत बांधण्यात येईल व त्या इमारतीत तेथील संक्रमण गाळ्यातील लोकांना हलविण्यात येईल. अशा रीतीने टप्प्या-टप्प्याने जागा रिकामी करुन पुनर्विकास योजना राबविण्यात येईल.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, कुलाबा संक्रमण शिबिरात ६३ लोक असे आहेत की, त्यांच्या जुन्या इमारतींची दुरुस्ती पूर्ण होऊनही ते तेथेच रहात आहेत. त्यामुळे त्यांच्या खोल्या रिकाम्या करुन घेतल्यावर एक इमारत बांधण्याइतकी जागा निश्चित उपलब्ध होणार आहे.

मा. सदस्य श्री. रेळे यांनी टिप्पणीमध्ये "घुसखोरांच्या ताब्यात असलेले गाळे जेथे शक्य असेल तेथे पाडण्यात येतील" असे नमूद केले आहे त्याचा अर्थ काय ? अशी विचारणा केली असता मा. सभापती यांनी माहिती दिली की, ओशिवऱ्यासारख्या काही संक्रमण शिबिरात एका कोपऱ्यामध्ये १५-२० गाळ्यांच्या चाळीमध्ये सगळे घुसखोरच आहेत. या घुसखोरांना बाहेर काढल्यानंतर पुन्हा पुन्हा ते घुसखोरी करतात, म्हणून आता त्या घुसखोरांना बाहेर काढल्यानंतर त्या चाळी ताबडतोब तोडून टाकायच्या.

मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, पुनर्विकास करावयाच्या वरील चार संक्रमण शिबिरातील गाळे वाटप प्रथम बंद करावे लागेल.

यावर मा. सदस्य श्री. विश्वासराव यांनी असे मत व्यक्त केले की, चार संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास करण्यासाठी त्या संक्रमण शिबिरात गाळे वाटप करण्याचे थांबविण्यात येणार आहे. तसेच सायन संक्रमण शिबिरातसुध्दा पुनर्विकासाकरता गाळे वाटप बंद केलेले आहे. त्यामुळे लोकांना जवळचे असे संक्रमण गाळे उपलब्ध होणार नाहीत. म्हणून निदान प्रतिक्षानगर, सायन येथील गाळेवाटप तरी बंद करु नये.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, संक्रमण शिबिरामध्ये बी.जी. शिर्के यांना चाळी पाडून जागा उपलब्ध करुन द्यायची आहे. म्हणून ज्या चाळी पाडायच्या आहेत त्यातील लोकांना प्रथम त्याच संक्रमण शिबिरात सामाऊन घ्यावे लागणार आहे. त्यामुळे तात्पुरती स्थगिती दिली आहे.

यावर मा. सदस्य श्री. विश्वासराव यांनी अशी माहिती दिली की, प्रतिक्षानगरमधील संक्रमण शिबिरामध्ये एस.आर.अे. योजनेसाठी काही गाळे राखून ठेवलेले आहेत. यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रतिक्षानगरामधील जे गाळे एस.आर.अे. योजनेसाठी त्यांच्या ताब्यात आहेत ते रिक्त करुन ती जागा बी.जी. शिर्के यांना देण्यासाठी तातडीने उपलब्ध करुन द्यावेत अशी मुंबई मंडळाने विनंती केलेली आहे. त्यामुळे त्या गाळयांत रहाणा-या लोकांना नोटीसा देण्यात आल्या आहेत व त्यांना तेथून हलविल्याशिवाय ते रिकामे करुन पाडता येणार नाहीत म्हणून त्या लोकांना हलविण्यासाठी काही गाळे रिक्त ठेवलेले आहेत. हीच परिस्थिती एस.आर.अे. योजनेच्या तसेच मंडळाच्या गाळेधारकांबाबत आहे.

मा. सदस्य श्री. विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, पावसाळ्यात [illegible] दक्षिण भागातील काही इमारती कोसळली. त्या इमारतीतील काही आजारी लोकांना के.ई.एम., सायन हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यासाठी सतत जावे लागत असल्यामुळे त्यांनी हॉस्पिटलच्या जवळील संक्रमण शिबिरातील गाळ्यांची मागणी केली आहे व त्यांनी स्वत: त्या लोकांना त्यांच्या मागणीनुसार गाळे द्यावेत अशी शिफारस करुनही अजून त्या आजारी लोकांना गाळे देण्यात आलेले नाहीत. मंडळाच्या कार्यालयातून सांगण्यात येते की, अशाप्रकारे गाळे देण्याबाबत [illegible] ठेऊ नये असे आदेश आहेत.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, प्रतिक्षानगरमधील एस.आर.अे. योजनेतील गाळेधारकांना रिक्त गाळयात हलविल्यानंतर आणखीही काही गाळे रिक्त उरतात. हे उर्वरीत रिक्त गाळेसुध्दा संक्रमण गाळे विभागाकडून मंडळाच्या गाळेधारकांना त्यांची मागणी असूनही व मा. सदस्यांची शिफारस असूनही दिले जात नाहीत व ह्या उर्वरित रिक्त गाळयांची माहिती संबंधित भाडेवसुलीकार देत नाही व तो वरिष्ठ अधिका-यांची दिशाभूल करतो.

यावर मुख्य अधिकारी यांनी एस.आर.अे. योजनेतील लोकांना देवून जर काही गाळे रिक्त राहिल्यास मंडळाच्या गाळेधारकांना त्या रिक्त गाळयांचे वाटप करण्यात येईल असे आश्वासन दिले.

..... १०/-

१९

मा. सदस्य श्री. मोडक यांनी असे मत व्यक्त केले की, खाजगी विकासकांना संक्रमण शिबिरातील गाळे देण्यात आलेले आहेत. ह्या खाजगी विकसकांनी बरीच वर्षे संक्रमण गाळे स्वत:च्या ताब्यात ठेवलेले आहेत. त्यांना आणखी किती काळ गाळे त्यांच्या ताब्यात ठेवण्यास परवानगी देण्यात येणार आहे ? त्यांच्या ताब्यातील गाळे असेच पडून असतील तर तेही मंडळाने संक्रमण शिबिरांची पुनर्विकास योजना राबविण्यासाठी स्वत:च्या ताब्यात घ्यावेत.

यावर अधिक माहिती देताना मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, एस.आर.ओ. योजनेतील खाजगी विकासकांनी नवीन बांधकाम करण्यासाठी संक्रमण गाळे स्वत:च्या ताब्यात घेतले व नंतर कोणतेही बांधकाम केलेले नाही. म्हणून काही दिवसांपूर्वी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या सहीने शासनास व मा.मंत्री महोदयांना कळविलेले आहे की, खाजगी विकासकांनी संक्रमण गाळे घेऊनही बांधकाम केले नसेल तर ते गाळे पुन्हा मंडळाच्या ताब्यात देण्यात यावेत.

वरील सविस्तर चर्चेअंती सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सूचनांच्या आधारे विषयांकित प्रस्ताव मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

— ० —

बाब क्रमांक : ५७/५

[ब] विषय :- संक्रमण शिबिरांचे पुनर्वसन गाळ्यांची संख्या व क्षेत्रफळ निश्चित करणे.

विषयांकित बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १३१ वर सादर करण्यात आल्याचे सांगून सचिव यांनी टिप्पणीमधील तक्त्यामध्ये "संक्रमण शिबिरातील गाळे" या कॉलमध्ये वांद्रे [पश्चिम] या संक्रमण शिबिरात ३२१ गाळे दर्शविण्यात आले आहेत, ते चुकीचे असून ४०० गाळे आहेत असे समजण्यात यावे व तशी सुधारणा करण्यात येत आहे.

यावर मा. सदस्य श्री. उसपकर यांनी निदर्शनास आणले की, पृष्ठ क्र. १२१ व पृष्ठ क्र. १३१ वरील तक्त्यांमध्ये जी माहिती देण्यात आलेली आहे त्यामध्ये तफावत आहे ~~असल्यामुळे चुकीची आहे~~.

यावर श्री. पडवळे, उपमुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, पृष्ठ क्र. १२१ वरील तक्त्यात टंकलेखित चुक झालेली असून वांद्रे [पू.] समोर ३२१ गाळे व वांद्रे [पश्चिम] समोर ४०० गाळे असे असावयास पाहिजे होते व तशी सुधारणा करण्यात येत आहे. या खुलाशानंतर मा. सदस्य श्री. उसपकर यांनी निदर्शनास आणले की पृष्ठ क्र. १२१ वरील

...... ११/-

तक्त्यांत जयकोच, गोरेगांव येथे एकूण गाळे २५८४ दाखविण्यात आले आहे, तर पृ.क्र. १२१ वर जयकोच, गोरेगांव समोर २६८८ गाळे दाखविण्यात आले आहेत. तसेच ओशिवरा, जोगेश्वरी येथे एकूण ८४० गाळे पृष्ठ क्र. १२१ वरील तक्त्यात दाखविलेले आहेत तर पृष्ठ क्र. १३१ वरील तक्त्यात ८६४ एकूण गाळे दाखविण्यात आलेले आहेत. तसेच रिक्त गाळ्यांबाबतसुध्दा देण्यात आलेली माहिती ही दोन तक्त्यांमध्ये वेगवेगळी दाखविण्यात आलेली आहे.

यावर मुख्य अधिकारी यांनी पृष्ठ क्र. १२१ वरील तक्ता जुना असून त्यामध्ये सुधारणा न करताच सादर केलेला दिसतो. परंतु १३१ वरील तक्ता बरोबर आहे व यापुढे बरोबर माहिती सादर करण्यात येईल असे आश्वासन दिले.

मा.सभापती यांनी माहिती दिली की, सुकथनकर समितीने असे मत व्यक्त केले की, मंडळाचे संक्रमण शिबीरे ही तळमजल्याची व तळ + एक मजल्याची आहेत. त्यामुळे बराचसा चटईक्षेत्र निर्देशांक फुकट जात आहे. साधारणत: शहरामध्येच संक्रमण शिबीरे असावीत असा उद्देश आहे. सुकथनकर समितीच्या ह्या शिफारशीनुसार शासनाने निर्णय घेऊन प्रयोगादाखल वरील चार संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास करण्यात येत आहे.

श्री. सकपाळ, मा.सदस्य यांनी असे निर्देशनास आणले की, मा. सदस्य श्री. सावरकर यांच्या बोलण्याचा हेतू हा आहे की, संक्रमण शिबिरात बहुमजली इमारती बांधल्यानंतर त्या सर्व बहुमजली इमारतींचा वापर संक्रमण शिबीर म्हणूनच केला पाहिजे.

यावर मुख्य अधिकारी यांनी निदर्शनास आणले की, मा. मुख्यमंत्री यांच्या सुचनेनुसार कुलाबा येथील बाजारभाव जास्त असल्यामुळे तेथे जरी विक्रीसाठी जास्त गाळे बांधले तरी इतर संक्रमण शिबिरांत आहेत त्यापेक्षा जास्त संक्रमण गाळे उपलब्ध होऊ शकतात. व त्यांचा खर्च हा कुलाबा येथील गाळ्यांच्या विक्रीमधून भागू शकतो.

मा. सदस्य श्री. सावरकर यांनी असे मत व्यक्त केले की, विक्रीमधून जे उत्पन्न मिळणार आहे त्यामधून कोणती संक्रमण शिबिरे भविष्यात बांधण्यात येणार आहेत याचीही माहिती प्रस्तावात दिली पाहिजे होती.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी प्रस्तावात विक्रीमधून मिळणाऱ्या पैशातून केवळ संक्रमण शिबिरेच बांधण्यात येणार नसून बृहतसूचीवरील भाडेकरूंसाठी इमारत बांधण्यात येईल असे प्रस्तावात म्हटलेले आहे, असे निदर्शनास आणून त्याप्रमाणे प्रत्यक्ष अंमलबजावणी,

झाली पाहिजे असे मत व्यक्त केले. त्यांनी पुढे असे मत व्यक्त केले की, दक्षिण मुंबईमध्ये कुलाबा येथे एकमेव संक्रमण शिबीर असल्याकारणाने निदान ५० टक्के गाळे हे संक्रमण शिबिरासाठीच ठेवले पाहिजेत.

यावर मा. सभापती यांनी असे सुचविले की, जेवढे संक्रमण गाळे तोडण्यात येतील तेवढे किंवा त्यापेक्षा अधिक गाळे हे संक्रमण शिबीर म्हणूनच बांधण्यात येतील.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी अशी सूचना केली की, नव्याने बहुमजली संक्रमण शिबिरे बांधताना इमारतीमधील सामाईक गॅलरी ही मोठी ठेवण्यात यावी.

मा. सदस्य श्री. भुवड यांनी विचारणा केली की, विक्रीसाठी जे गाळे बांधण्यात येणार आहेत ते किती चौ. फूटाचे असणार आहेत. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, मध्यमवर्गीयांसाठी गाळे बांधण्यात येणार असून ४५० चौरस फुटाच्यावर गाळे शक्यतो बांधले जाणार नाहीत. ~~बांधले जाणार नाहीत.~~

मा. सदस्य श्री. भुवड यांनी असे निदर्शनास आणले की, गेल्या २५ वर्षांत केवळ दोनच इमारती दक्षिण मुंबईमध्ये पुनर्रचित झालेल्या आहेत. यावरुन सध्या कुलाबा संक्रमण शिबिरात रहाणाऱ्या लोकांना आयुष्यभर संक्रमण शिबिरात रहावे लागेल असे दिसते. बृहत्सूचीनुसार गाळे वितरण करायचे झाल्यास ते कुलाबा भागात गाळे मिळतील असे वाटत नाही. त्यामुळे कुलाबा भागाच्या बाहेर फेकले जाण्याचीच जास्त भिती आहे.

मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, यापुढे नवीन बांधण्यात येणारे संक्रमण गाळे हे २२५ चौ. फूटाचे बांधण्यात येतील.

मा. सदस्य श्री. विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, मागे असा विचार झालेला आहे की, यापुढे संक्रमण गाळा २२५ चौ. फुटाचा बांधण्यात येईल व ज्यांना कायमस्वरुपी संक्रमण गाळ्यात रहायचे असेल तर त्यांना कायमस्वरुपी गाळा मिळू शकेल.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, शासन स्तरावर असा निर्णय झाला की, संक्रमण गाळे जर २२५ चौ. फुटाचे बांधले तर लोक तेथेच कायम रहावयास मागतील. शिवाय १८० चौ. फुटाचे गाळे बांधले तर अधिक संक्रमण गाळे उपलब्ध होतील व संक्रमण शिबिरात माणूस कायमचा रहात नसतो, तो कमी काळासाठी रहात असतो, त्यामुळे १८० चौ. फुटाचे गाळे बांधणे संयुक्तिक होईल.

मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, वडाळा येथील संक्रमण शिबिराच्या पुनर्विकासाचे काम सुरु असून दोन बहुमजली इमारती बांधण्यात आलेल्या आहेत व आता

आणखी एका इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात येत असून प्लॅन पूर्वीच मंजूर झालेले असून त्या प्लॅनप्रमाणेच १८० चौ. फुटाच्या गाळ्यांची बहुमजली इमारत बांधण्यास मंजूरी मिळण्यासाठी आजच्या बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

मा. सदस्य श्री. विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, वडाळा संक्रमण शिबिरात ज्या बहुमजली इमारती बांधण्यात आल्या त्या बहुमजली इमारतींमध्ये ५० टक्केच्यावर गाळे एस. आर. ए. ला दिले गेले व जे लोक गेली २०–२५ वर्षापासून जुन्या गाळ्यांमध्ये खितपत पडलेले आहेत पावसाळ्यामध्ये घरात पाणी साचून चिखलामध्येच रहात होते अशा लोकांना जागा देण्यात आल्या नाहीत. त्यावेळच्या मुख्य अधिका-यांना, अध्यक्षांना विनंती करुनही त्यांना जागा न देता एस. आर. ए. योजनेमधील गाळेधारकांना देण्यात आल्या. याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

सविस्तर चर्चेनंतर विषयांकित प्रस्ताव खालीलप्रमाणे मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक: ५७/४२९

[अ] मुंबई बेटावरील व उपनगरातील मंडळाच्या अखत्यारीतील संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास करण्यासाठी तेथील गाळ्याचे वाटप करणे व पाडणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

[ब] मुंबई बेटावरील व उपनगरातील मंडळाच्या अखत्यारीतील संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास करताना [१] संक्रमण शिबिराच्या आता जेवढी संख्या आहे तेवढीच ठेवण्यात यावी [२] संक्रमण शिबिराच्या पुनर्विकासातून जो निधी उपलब्ध होईल त्याचा विनियोग संक्रमण शिबिरासाठी करण्यात यावा व [३] नवीन संक्रमण शिबिराचे क्षेत्रफळ किमान १८० चौ.फुट असावे यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

तसेच वडाळा येथील संक्रमण शिबिराचे बांधकाम मंजूर आराखडयानुसार १८० चौ.फुट क्षेत्रफळाचे गाळे बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली व ते गाळे उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरुना देण्याची मा. सदस्यांची विनंती मान्य करण्यात आली.

———x ××× x———

बाब क्रमांक : ५७/६

विषय :– मुंबई बेटावरील उपकरपात्र इमारतींच्या नाहरकत प्रमाणपत्र अंतर्गत पुनर्विकासास अडथळा निर्माण करणा–या भोगवटादारांना तडकाफडकी काढण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

विषयांकित बाब टिप्पणी पृष्ठ क्रमांक : १३५ ते १३९ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, या विषयाबाबत शासनाकडून निर्णय मिळेपर्यंत हा प्रस्ताव थांबवून ठेवावा.

यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, शासनानेच याबाबतचे मंडळाचे मत व प्राधिकरणाचे मत त्यांना पाठवावे असे कळविल्यामुळे सदर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, मा. सदस्य श्री. दगडू सकपाळ यांनी या विषयाबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांमुळे मा. मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर एक बैठक बोलाविली होती. कलम ९४ [५] अंतर्गत मंडळाच्या पुनर्रचित इमारतीतील गाळेधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था तयार करायच्या. त्यासाठी ७० % लोकांची संमती मिळाली आणि ३० % लोकांची संमती मिळाली नाही किंवा एखाद्या नाहरकत प्रमाणपत्रधारकाने ७० % लोकांची संमती मिळविली व ३० % लोक संमती देण्यास तयार नसतील तरीही विकासामध्ये काही अडथळे येऊ नयेत म्हणून हे ३० % लोक त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे आपोआपच सभासद रहातील, अशी सुकथनकर समितीने शिफारस केलेली आहे. परंतु शासनाच्या प्रशासकीय स्तरावर चुकीचा विचारविनीमय होऊन या ३० % लोकांना तडकाफडकी बाहेर काढण्याचा निर्णय झाला. अशा त-हेने तडकाफडकी कोणालाही बाहेर काढता येत नाही. म्हणून मा. मुख्यमंत्री यांनी सुचविले की, हा विषय मंडळा-समोर व प्राधिकरणासमोर ठेऊन त्यांचे मत त्यांना कळवावे. त्याप्रमाणे हा विषय ठेवण्यात आलेला आहे. त्यानुसार मंडळाने आपले असे मत कळवावे की, ७० टक्के लोक सहकारी गृहनिर्माण संस्था बनविण्यासाठी एकत्र आले व ३० टक्के लोक काही कारण नसताना जर अडवणुकीचे धोरण करत असतील तर तडकाफडकी त्यांना बाहेर काढण्या-ऐवेजी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सभासद म्हणूनच समजावे.

यावर जर ते ३० % लोक न्यायालयात गेले तर काय ? अशी विचारणा मा. सदस्य श्री. रेळे यांनी केली असता त्यासाठीच कायदा करायचा आहे अशी मा. सभापती यांनी माहिती दिली.

मा. सदस्य श्री. रेळे यांनी निष्कासनाबाबत विचारणा केली असता मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, काही इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी खाजगी विकासकांना मंडळातर्फे नाहरकत प्रमाणपत्र दिले जाते. सदर नाहरकत प्रमाणपत्र हे त्या इमारतीतील ७० % किंवा जास्त लोकांची पुनर्बांधणीस संमती असते म्हणूनच दिलेले असते. परंतु अशा पुनर्बांधणीस उर्वरित काही भाडेकरु सहकार्य देत नाहीत व जागा रिकामी करुन देत नाहीत.

.... १५/-

त्यामुळे पुनर्विकासाच्या कामात अडथळा होतो. अशावेळी खाजगी विकासक मंडळाकडे येऊन संबंधित भाडेकरूंवर कारवाई करण्यास विनंती करतात. त्यावेळी मंडळ शासनाने अशा-हेच्या भाडेकरूंना तडकाफडकी गाळ्याबाहेर काढण्याचे अधिकार कायद्याने दिलेले असल्यामुळे त्या अधिकारांचा वापर करून पुनर्विकासाच्या कामात अडथळा आणणाऱ्या भाडेकरूंना तडकाफडकी बाहेर काढू शकते. मध्यंतरी मा. मुख्यमंत्री यांनी या निर्णयाचा पुनर्विचार करण्यासाठी मत कळविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

मुख्य अधिकारी यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, वरील दोन वेगवेगळ्या प्रक्रीया असून त्यापैकी एक मंडळाच्या पुनर्रचित इमारतीमधील ७० % लोक एकत्र आले व त्यांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन केली तर उर्वरित ३० % लोक हे आपोआपच सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सभासद होतील. परंतु खाजगी विकासकास ७० % किंवा जास्त भाडेकरूंच्या संमतीने खाजगी विकासकास त्याच्या इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी नाहरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर उर्वरित लोकांनी जर पुनर्विकासाच्या कामात अडथळे आणले तर पुनर्विकास होऊ शकणार नाही हे लक्षात घेऊन त्यांच्यावर तडकाफडकी बाहेर काढण्याची कारवाई करण्याचा अधिकार मंडळास असावा की नाही यावर विचार होणे गरजेचे आहे.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, ७० % लोकांनी पुनर्बांधणी कामास संमती दिल्यानंतर उर्वरित ३० % लोक जर पुनर्बांधणीच्या कामास सहकार्य देत नसतील व अडथळे आणत असतील तरी त्यांना त्या ७० % लोकांबरोबरच त्या संस्थेचे सभासद व भाडेकरू समजण्यात येईल व त्यांना संक्रमण शिबिरात जावे लागेल आणि गेले नाहीत तर मात्र मंडळ त्यांना संक्रमण शिबिरात पाठवेल.

मा. सदस्य श्री. सावरकर यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांच्यासमोर ठेवलेल्या माहितीनुसार काही विकासकांनी नाहरकत प्रमाणपत्र घेऊन २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाची सवलत मिळेल या प्रतिक्षेत आहेत. व त्यांनी कामास सुरवातही केलेली नाही. अशा परीस्थितीत विकासकांना अडथळा निर्माण करणाऱ्या भाडेकरूना तडकाफडकी बाहेर काढण्याचा अधिकार देणे म्हणजे त्यांना एक प्रकारे संरक्षण दिल्यासारखे आहे.

.....१५/-

मा॰ सदस्य श्री॰ सक्पाळ यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांच्या माहितीतील एका विकसितकाराने पुनर्विकासाकरिता लोकांना रहाण्यासाठी जे संक्रमण गाळे बांधलेले आहेत ते इतके खराब बांधलेले आहेत की, ते गुरांसाठी बांधलेले खुराडे वाटतात॰ लोकांनासुध्दा त्याने हैराण केलेले आहे॰

यावर मा॰ सभापती यांनी माहिती दिली की सदर विकसितकाराला लोक विचारात की, तो खुल्याविक्रीसाठी इमारत पहिली बांधणार की गाळेधारकांना रहाण्यासाठी इमारत पहिली बांधणार ? तर तो सांगतो की विक्री करायची इमारत प्रथम बांधणार खरेतर लोकांच्या म्हणण्यानुसार व मंडळाच्या अटीप्रमाणे त्याने लोकांच्या पुनर्वसनाची इमारत पहिली बांधायची व खुल्या विक्रीसाठी इमारत नंतर बांधायची व तशीच सी॰सी॰ दिली जाते॰ असे असूनही सदर विकसक स्वत:चेच म्हणणे खरे करत आहे॰ तो कोणाचेही ऐकत नाही॰ वरील माहितीनंतर मा॰ सभापती यांनी कायद्याच्या पुस्तकातील संबंधित कलम वाचून दाखविले व असे मत व्यक्त केले की, विकसकाने एकदा मंडळाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेतल्यानंतर मंडळाने पुढील गोष्टींकरता जबाबदारी घेण्याची गरज नाही॰ परंतु दुसरी बाजू अशी आहे की, मंडळाला पुनर्विकास करण्यासाठी आर्थिकदृष्टया परवडत नाही म्हणून खाजगी विकसकाला "नाहरकत प्रमाणपत्र" देते व त्याला चटईक्षेत्र निर्देशांकाचा फायदा त्याला देण्यात येतो तो अशासाठी की त्याने शासनाला पुनर्विकासाच्या कामात मदत करावी॰ परंतु विकासकाचे असे म्हणणे असते की, त्याने ७० % लोकांची संमती मिळवून पुनर्विकासाच्या कामासाठी त्याने शासनाकडून "नाहरकत प्रमाणपत्र" घेतलेले आहे व उर्वरित ३० % लोक त्याच्या कामात अडथळा आणत आहेत॰ म्हणून आज असा निर्णय घेण्यात यावा की, त्या ३० % लोकांना पुनर्विकासाच्या कामात अडथळा आणता येणार नाही॰ जर ७० % लोकांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाली असेल तर ३० % लोक त्या सहकारी संस्थेचे आपोआपच सभासद ~~होतील व~~ गाळेधारक होतील आणि तरीही लोक ऐकले नाहीत तर मग त्या विकसकाला योग्य मार्गाने न्यायालयात जाऊन त्यांना गाळ्याबाहेर काढता येईल॰ परंतु ती जबाबदारी कोणत्याही परीस्थितीमध्ये मंडळाची रहाणार नाही॰ तसेच सदर विकास कामात अडथळा आणणा-या लोकांना कायद्याप्रमाणे एक वर्षाची शिक्षा व रु॰ १०,०००/- चा दंड करण्याची कारवाई विकसक करु शकतो व त्यांनी पुढे सूचना केली की, अशाप्रकारचा प्रस्ताव बनवून तो प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावा, यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले॰

ठराव क्रमांक : ५७/४३०

मुंबई बेटावरील उपकरपात्र इमारतींच्या ना हरकत प्रमाणपत्र अंतर्गत पुनर्विकासात अडथळा निर्माण करणाऱ्या भोगवटादारांना तडकाफडकी काढण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबतच्या प्रस्तावावर चर्चा होऊन चर्चेअंती मंडळाकडे असलेला कर्मचारीवर्ग तसेच कामाची व्याप्ती लक्षात घेता ही अधिक जबाबदारी मंडळाने न घेता संबंधित विकासकाने योग्य मार्गाने न्यायालयात जावून तडकाफडकी निष्कासन करण्याची कार्यवाही करावी, तशी म्हाडा ॲक्टमध्ये सुधारणा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

= ० =

बाब क्रमांक : ५७/७ [उत्तर परिमंडळ]

[अ] विषय :- इमारत क्रमांक : ५, रामनिवास, पिक्तवाला रोड, मुंबई या इमारतीच्या पुनर्बांधणी - प्रस्तावाबाबत.

विषयांकित प्रस्ताव पृष्ठ क्र. १४१ ते १४५ वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता [उत्तर], श्री. भुवनदास यांनी माहिती दिली की, मा. विधानसभा अध्यक्ष, श्री. दत्ताजी नलावडे यांनी अशी सूचना केली आहे की, विषयांकित इमारतीची पुनर्बांधणी करण्यात यावी. परंतु मंडळाच्या नियमाप्रमाणे त्या इमारतीची सिलींग मर्यादा संपलेली नसल्यामुळे ती पुनर्बांधणीस घेणे शक्य होणार नाही. शिवाय इमारतीच्या मालकाने अधिक भरायची रक्कम स्वत:च भरलेली आहे. गाळेधारकांनी भरलेली नाही. त्यामुळेही ८८[३] ने करता येत नाही. परिणामत: पुनर्बांधणी करता येणार नाही. आणि जर मंडळाने सदर इमारत पुनर्बांधणीसाठी घेतली तर मालक दुरूस्तीसाठी न्यायालयात जाईल, कारण त्यांने तसे त्याच्या दिनांक :२६.१.९८ च्या पत्राद्वारे कळविले आहे.

यावर मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी मा. विधानसभा अध्यक्षांना ह्या अडचणी कळविण्यात याव्यात अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री. रेळे यांनी असे सुचविले की, मा. अध्यक्षांच्या विनंतीचा मान राखण्यासाठी इमारतीच्या मालकास चर्चेसाठी बोलावून त्यातून काही मार्ग निघत असेल तर पहावे.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, बांधकामाची मर्यादा रु. ७५० असताना सुध्दा अधिकची रक्कम भरण्याची गोळेधारकांनी तयारी दाखविली नव्हती. त्याहीवेळेस मालकाने अधिकची रक्कम भरण्याची तयार दर्शविली होती. आता तर मर्यादा रु. १०००/- झालेली आहे. तसेच न्यायालयात प्रकरण गेल्यास न्यायालयास सांगण्यात यावे की, जरी सिलींग मर्यादा संपलेली नसली तरी तांत्रिकदृष्टया तसेच संरचनात्मकदृष्टया ही इमारत मजबूत नाही व ती कोणत्याही क्षणी कोसळू शकते.

यावर मुख्य अधिकारी यांनी इमारतीची दुरुस्ती करुन ती मजबूत करु शकतो का ? अशी विचारणा केली असता श्री. भुवनदास, उपमुख्य अभियंता यांनी इमारतीची दुरुस्ती केल्यास ती इमारत संरचनात्मकदृष्टया चांगली होऊ शकेल. असे सांगितले.

श्री. पालीवाल, कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिली की, ह्या इमारतीच्या शेजारील इमारतीची मंडळातर्फे पुनर्रचना करण्या येणार आहे. भविष्यात विषयांकित इमारत पुनर्रचित होणार नाही. तो अरुंद भूखंड म्हणून रहाणार आहे. रहिवाशांचे मत हया इमारतीची पुनर्रचना करण्यात यावी असे आहे. त्यावेळी असा प्रस्ताव सादर करण्यात आला होता की, ८९[३] व ८९[५] कलमामध्ये अशी तरतूद आहे का, जर रहिवाशांचा दुरुस्तीस विरोध असेल तर दुरुस्ती रद्द करु शकतो. परंतु या प्रस्तावावर निर्णय होऊ शकला नाही व रहिवाशांना सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी विचारुन ते तयार झाल्यास इमारतीची दुरुस्ती करावी असे ठरले. परंतु आज अडचण अशी निर्माण झाली आहे की, घरमालकाने अधिकची रक्कम भरलेली असल्यामुळे पुनर्रचनेच्या विरोधात तो जर न्यायालयात गेला तर लोक आज संक्रमण शिबिरात असल्यामुळे त्यांना ते थेच रहावे लागेल व इमारतीची दुरुस्तीही करुन देता येणार नाही वा पुनर्रचनाही करता येणार नाही. व इमारतीची अवस्था दिवसेंदिवस वाईट होत जाणार. रहिवाशांचा दुरुस्तीस विरोध असल्यामुळे शेजारच्या पुनर्रचनेच्या इमारतीचा नकाशा असा तयार केला होता की, जर ही इमारत व शेजारची इमारत घेऊन संयुक्त पुनर्रचना योजनामध्ये घेता आली तर त्याप्रमाणे हया इमारतीची पुनर्रचना करावी. आणि जर पुनर्रचनेविरुध्द घरमालक कोर्टात गेला तर ही इमारत संयुक्त पुनर्रचनेअंतर्गत न घेता व शेजारची पुनर्रचना योजना खोळंबणार नाही या दृष्टीकोनातून ~~नकाशा तयार करण्यात आला होता.~~ नियोजन करण्यात आले आहे.

यावर मा. सभापती यांनी अशा परिस्थितीत सदर इमारत ८८ [३] अ न करता ती ८८ [ब] करता येईल का ? अशी विचारणा केली असता श्री. पालीवाल, कार्यकारी अभियंता यांनी या इमारतीची ८८ [ब] करता येणार नाही असे सांगून

त्यामधील तांत्रिक अडचण निदर्शनास आणली.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असे मत व्यक्त केले की, भालेराव मार्गावरील ५-सी ही इमारत जशी संपादित करण्यात आली त्याप्रमाणे विषयांकित इमारत संपादन करण्यास हरकत नाही.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, सदर इमारत जर सी. डी. एस. मध्ये घेतली व मालक न्यायालयात गेला तर न्यायालयात सादर करण्यासाठी मंडळाने केलेल्या कार्यवाहीच्या समर्थनार्थ मुद्दे तयार करुन ठेवावेत.

यावर श्री. पालीवाल, कार्यकारी अभियंता यांनी निदर्शनास आणले की, कलम ८९ [३] व ८९ [५] नुसार जर रहिवाशांचा दुरुस्तीस विरोध असेल तर दुरुस्ती टाळू शकतो व याच कलमाचा आधार घेऊन घरमालकास कळविले व तो त्याविरुध्द न्यायालयात गेला तरी बाकीची पुनर्रचना योजना चालू राहील.

यावर मा. सभापती यांनी सूचना केली की, रहिवाशांना त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांची इमारत पुनर्रचनेसाठी घेतल्यास येणाऱ्या तांत्रिक अडचणींची त्यांना माहिती द्यावी व त्या अडचणींमुळे पुनर्रचनेच्या कामास जरी वेळ लागला तरी त्यांची तयार असावी.

मा. सदस्य श्री. मोडक यांनी माहिती दिली की, ह्या इमारतीच्या रहिवाशांबरोबर मा. विधानसभा अध्यक्षांनी दोन बैठका घेतलेल्या आहेत. इमारत धोकादायक असून इमारतीच्या दुरुस्तीसाठी त्यांचा ठाम विरोध आहे. मुंबईतल्या कोठल्याही घरमालकाने अधिकची रक्कम भरली असल्याचे उदाहरण नाही. या इमारतीच्या मालकाने मंडळाच्या पुनर्बांधणी योजनेस खो घालण्यासाठीच अधिकची रक्कम भरलेली दिसते. म्हणून श्री. पालीवाल, कार्यकारी अभियंता यांनी सांगितल्याप्रमाणे व सन्मा. सदस्यांनी भावना व्यक्त केल्याप्रमाणे पुनर्रचना करण्यासाठी कायदेशीर तरतुद करुन ठेवावी.

मा. सभापती यांनी मा. विधानसभा अध्यक्ष, श्री. दत्ताजी नलावडे, सन्मा. सदस्य व रहिवाशांचे मत लक्षात घेऊन पुनर्बांधणी योजना सी. डी. एस. मध्ये घेऊ आणि घरमालक न्यायालयात गेला व त्याने काही अडथळे आणल्यास तर उरलेल्या पुनर्बांधणी कार्यक्रमास अडथळा न येता विषयांकित इमारतीची दुरुस्ती करता येईल अशा प्रकारे तरतूद करुन पुनर्बांधणीचा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा असे मत व्यक्त केले. व या मतानुसार पुनर्बांधणी करण्यास सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.

..... २०/-

[ब] विषय :- कुलाबा संक्रमण शिबीर इमारत क्रमांक : ३४ व
३५ मधील मोकळया परिसरात [illegible]
श्री. [illegible] शास्त्री आठवले संचलित स्वाध्याय

[ब] विषय :- कुलबा संक्रमण शिबीर इमारत क्र. ३४ व ३५ मागील मोकळया परिसरात परमपूज्य श्री. पांडूरंगशास्त्री आठवले संचालित स्वाध्याय केंद्रास परवानगी मिळणेबाबत.

विषयांकित बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १४७ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. भुवड यांनी असे निदर्शनास आणले की, संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास करायचा जो प्रस्ताव आहे त्या प्रस्तावानुसार ज्या भागावर बहुमजली इमारत बांधण्यात यायची आहे त्या जागेला लागूनच विषयांकित भूखंड आहे. हया अगोदर पांडूरंगशास्त्री आठवले स्वाध्याय परीवारातर्फे इमारत क्र. ४४ च्या पाठीमागे त्याचे केंद्र चालविले जात असे. आता त्यांच्यामध्ये दोन गट पडलेले असून इ.क्र. ४४ च्या मागील भूखंडावर लाद्या वगैरे आमदार निधीतून बसविण्यात आलेल्या आहेत व तेथे आता बालवाडी उभारण्याचा नार्वेकर गटाचा प्रस्ताव आहे.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, पांडूरंगशास्त्री आठवले हे हया देशामध्ये स्वाध्यायाचे चांगले काम करत असल्यामुळे हा प्रस्ताव आणण्यात आला होता. परंतु म . सदस्यांनी निदर्शनास आणलेल्या बाबी लक्षात घेता हा प्रस्ताव पुढे ढकलण्यात यावा. मध्यंतरी सर्व माहिती काढून जर त्या दोन गटांनी एकत्र येऊन केंद्र चालवायचे ठरविले तरी त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र घ्यावे लागेल की, पुनर्विकासाठाठी जेव्हा मंडळास त्या जागेची गरज लागेल तेव्हा ते बांधकाम तोडून ती जागा मंडळाच्या ताब्यात देतील. यास सर्वांनी सहमती दर्शविली.

[क] विषय :- १९९५-९६ च्या दरसूचीवर कमी टक्कयांनी प्राप्त झालेल्या निविदांबाबत...

विषयांकित बाब टिप्पणी पृष्ठ क्र. १४९ ते १५३ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, महानगरपालिकेमध्ये जी छोटी छोटी कामे असतात त्या कामांसाठी बरेचसे ठेकेदार स्पर्धेसाठी ३० % कमी, ४० % कमीने निविदा भरतात. परंतु हे ठेकेदार पैसे तर घेऊन जातातच पण काम मात्र बरोबर दर्जाचे करत नाहीत. म्हणून ठेकेदारांच्या स्पर्धेमुळे कामाची वाट लागता कामा नये म्हणून प्रशासनाने हा प्रस्ताव आणलेला आहे. म्हणून प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे १० % च्या कमी खाली ज्यांची निविदा असेल त्यांची निविदा मंजूर करायची नाही व पुन्हा निविदा मागवायची या मतास सर्वांनी सहमती दर्शविली व प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

[ड] विषय :- उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

विषयांकित प्रस्ताव पृष्ठ क्र. उ-१ ते उ-११५ वर मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

मा. सभापती यांनी विचारणा केली की, ज्या इमारतींचा उपकर अद्यावत भरलेला नाही. अशा इमारती सन्मा. सदस्यांनी निदर्शनास आणल्या होत्या त्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली ? त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, कोर्ट रिसीव्हरच्या ताब्यात जरी इमारत असली तरी त्या इमारतीचा उपकर भरला पाहिजे असा धोरणात्मक निर्णय झालेला असून उपकर भरण्याबाबत महानगरपालिका आयुक्त किंवा करनिर्धारक आणि संकलक यांच्या सहीने कोर्ट रिसीव्हरला पत्र पाठविण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आले का ? अशी विचारणा महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-याकडे केली.

यावर महानगरपालिका अधिका-यांनी कोर्ट रिसीव्हरच्या ताब्यातील इमारतींबाबत महानगरपालिकेच्या विधी सल्लागारांचा सल्ला मागण्यात आलेला आहे अशी माहिती दिली.

यावर मा. सभापती यांनी सूचना केली, सदर बाब ही तांतडीची असल्यामुळे, व रहिवाशी भाडयाचे व उपकराचे पैसे भरत असल्यामुळे ते मंडळाकडे जमा करणे ~~आवश्यक~~ जरुरीचे आहे.

यावर महानगरपालिका अधिका-यांनी उपकर भरावयाचा बाकी असलेल्या इमारतींच्या बाबतीत करण्यात येत असलेल्या कारवाईची माहिती सभागृहास दिली.

चर्चेअंती उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्याचे ~~आली~~ ठरले. ~~म्हणून प्रशासनाने हा प्रस्ताव~~

मा. अध्यक्षांच्या परवानगीने स्थगित प्रस्ताव उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी मान्यतेसाठी सादर केले व त्या प्रस्तावांस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[ड] इ.क्र. २३७, सुपारीवाला मॅन्शन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड मुंबईच्या इमारती बाबत.

...... २२/-

<u>ठराव क्रमांक : ५७/४३१</u> [<u>उत्तर परिमंडळ</u>]

उत्तर परिमंडळातील खालील प्रस्तावांवर सविस्तर प्रदीर्घ चर्चा होऊन चर्चेअंती पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

अ] इमारत क्र. ५, राम विलास, फितवाला रोड, मुंबई-१३ या इमारतीच्या पुनर्बांधणी प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चेअंती शेजारच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेत सदर इमारत समाविष्ट करुन तिची पुनर्बांधणी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ब] कुलाबा संक्रमण शिबिर, इ. क्र. ३४ व ३५ मागील मोकळया परिसरात परमपूज्य श्री. पांडूरंगशास्त्री आठवले, स्वयंचलित स्वाध्याय केंद्रास परवानगी देण्याचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यात आला.

क] उत्तर परिमंडळाच्या अखत्यारितील सन १९९५-९६ दरसूचीवर कमी टक्क्याने प्राप्त झालेल्या दुरुस्ती कामांच्या निविदांबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती परिशिष्ट "अ-9" मधील निविदा पुन्हा मागविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ड] उत्तर परिमंडळातील परिशिष्ट "अ" मधील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ व सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना व घेतलेल्या हरकतीच्या अधिन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

=xox=

<u>बाब क्रमांक : ५७/८</u> [<u>दक्षिण परिमंडळ</u>]

[अ] विषय :- दक्षिण परिमंडळातील "अ" विभागाच्या प्रचलित मर्यादा रु. ७५०/- प्रति चौ.मी.ने प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकांची सुधारित मर्यादा रु. १०००/- प्रति चौ.मी. एवढी वाढविण्याबाबत.

विषयांकित प्रस्ताव मान्यतेसाठी पृष्ठ क्र. द-१ वर सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी ~~असे सुचविले~~ निदर्शनास आणले की रु. १०००/- ची मर्यादा होण्यापूर्वी ज्या ठिकाणी आमदाराने स्वत:च्या फंडातून पैसे ~~भरले~~ दिलेले आहेत ~~ते वापरायचे आहे.~~ [illegible] त्यांच्या [illegible] करून [illegible] नाही परंतु काम सुरु केले असल्याने अशा ठिकाणी ~~चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.~~ प्रचलित मर्यादा लागू करणे आवश्यक आहे. तरी [illegible] मंजूरी देण्यात यावी.

१०००. २२/-

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[ब] विषय :- दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करणेबाबत.

विषयांकित प्रस्ताव पृष्ठ क्र. द-३ व २२७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

पृष्ठ क्र. द-२५ वरील इ.क्र. ११७, एस.के. रोड या इमारतीचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी आले असता मा. सदस्य श्री. रेळे यांनी निदर्शनास आणले की, या इमारतीचा उपकर रु. ६,२८,०००/- थकीत आहे.

यावर श्री. वनीकर, उपमुख्य अभियंता यांनी खुलासा केला की, या इमारतीचा १९९० पर्यंतचा उपकर भरण्यात आलेला आहे. वरील माहितीनंतर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पृष्ठ क्र. द-९९ वरील इ.क्र. १८-३, तिसरा भोईवाडा या इमारतीसाठी आधी ३६ लाख रुपये व आता १८ लाख रुपये खर्च करण्यात येत असल्यामुळे सदर इमारतीस भेट देण्याची इच्छा व्यक्त केली व भेट देण्याच्या अटीवर सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पृष्ठ क्र. १७९ वरील इ.क्र. ५३९-अे, ५३९-बी, या इमारतीचा उपकर १९७९ पर्यंतची भरला असल्याचे मा. सदस्य श्री. उसपकर यांनी निदर्शनास आणले असता उपमुख्य अभियंता [दक्षिण] श्री. वनीकर, यांनी माहिती दिली की, सदर इमारत कोर्ट रिसीव्हरच्या ताब्यात असून लोक भाडे भरत आहे.

यावर मा. सभापती यांनी महानगरपालिका अधिकाऱ्यांना कोर्ट रिसीव्हरला कळविण्यास सांगितले की, या इमारतीचा उपकर अद्यापत भरला नाही तर नियमाप्रमाणे मंडळ या इमारतीची दुरुस्ती करणार नाही व इमारत धोकादायक असल्यामुळे प्राणहानी व वित्तहानी होऊ नये म्हणून त्यांनी उपकराचे पैसे त्वरीत भरावेत. या सूचनेनंतर सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

[अ] मा. अध्यक्षांच्या परवानगीने दक्षिण परिमंडळातील खालील प्रस्ताव उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी सादर केले व ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

१] इ.क्र. १३२-१३६, काबेकर स्ट्रीट, २ रा टप्पा.

२] इ.क्र. ४-४-अे, नवरोजी हील रोड, १ ला टप्पा सुधारीत.

३] इ.क्र. ६४-६८, काझी सय्यद स्ट्रीट, ४ था टप्पा.

४] इ.क्र. ५२, ५२-अे, सॅम्युअल स्ट्रीट, २ रा टप्पा.

५] इ.क्र. २४-२६ काबेकर स्ट्रीट, २ रा टप्पा.

६] इ.क्र. ४५७, एम.अे. रोडच्या संरचनात्मक दुरुस्तीस सुधारीत प्रशासकीय मान्यतेपेक्षा जादा खर्चास मान्यता मिळणेबाबत.

... २४/-

[७] इ.क्र. ५२, सी.डी. खतर गल्ली, ४ था टप्पा.

[८] इ.क्र. ५२-अे, प्रॉक्टर रोड, ३ रा टप्पा.

[९] इ.क्र. २७९, जहांगीर दादी स्ट्रीट, १ ला टप्पा मा. सभापती यांनी पहाणी करण्याच्या अटीस अधिन राहून मंजूर.

[ब] विषय :- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बैठकीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकांस प्रचलित मर्यादा रु. १०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत.

विषयांकित प्रस्ताव पृष्ठ क्र. २७३ ते २८१ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

——xooox——

ठराव क्रमांक : ५७/४३२

दक्षिण परिमंडळातील खालील प्रस्तावांवर चर्चा होवून सविस्तर चर्चेअंती पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

अ] दक्षिण परिमंडळातील ~~"अ" विभागाच्या~~ प्रचलित मर्यादा रु. ७५०/- प्रती चौ.मी.ने प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकांना सुधारित मर्यादा रुपये १०००/- प्रती चौ.मी. एवढी वाढविण्याबाबतच्या परिशिष्ट "ब" मधील कामांना सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ब] दक्षिण परिमंडळातील परिशिष्ट "ब-१" मधील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना व घेतलेल्या हरकतीच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

—x—

अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी घ्यावयाचे विषय

विषय :- मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी घरमालक/विकसक/भाडेकरुंची संस्था यांना "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचे प्रस्ताव.

१] अंतिम भूखंड क्र. २९५, नगर रचना योजना क्र. ३, माहीम विभाग, इमारत क्र. १४३, १४३-सी, १४३-डी, १३५ आणि १४३-डी-ए, एल.जे. मार्ग, माहीम, मुंबई.

[२] भूकर पहाणी क्र. ५५२, माटुंगा विभाग, इ.क्र. १०-१० ए व १०-बी लक्ष्मी नारायण लेन, उपकर क्र. फ ७५४३[४] व ७५४३ [४-अ], माटुंगा, मुंबई.

